# शाश्वत विकास आणि संतसाहित्य

**डॉ.शोभा तितर**
**मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,पुणे**
**भ्रमणध्वनी : ९९२१४९०९९२**

परिवर्तन हा मानवी जीवनाचा स्थायीभाव आहे. पाश्चात विचारवंत अल्विन टॉफ्लर यांनी मानवी जीवनातील बदलांचा विचार करताना तीन कायापालट सांगितले . पहिला भटक्या जमातीचा कालखंड, दुसरा शेतीप्रधान समाजाचा कालखंड आणि औद्योगिक क्रांतीनंतरचा कालखंड! यंत्रयुगातील उर्जेची उधळपट्टी करणारे तंत्रज्ञान फार काळ टिकणार नाही असे सांगून ते निसर्गातील संतुलनाच्या मर्यादा स्पष्ट करतात. आणि तिसरा कायापालट हा नवे तंत्रज्ञान व नव्या उत्पादन प्रक्रियांचा कालखंड असून त्याही कालखंडाचे विशेष ते सांगतात. अशा तीन कालखंडातील बदल हे सर्वंकष आणि मूलगामी आहेत तसेच ते क्षणात घडून न येता वेगवेगळ्या परिस्थितीत आणि कालखंडात घडून आले आहेत. अशी मांडणी करून मानवी भविष्याचा वेध घेताना त्यांनी औद्योगिक क्रांतीनंतरच्या तिसऱ्या कायापालटानंतर मानवी समाजाने ज्ञानाधिष्ठित कालखंडात प्रवेश केला आहे असे सांगून या कालखंडाच्या शक्यता वर्तविल्या आहेत.एकविसाव्या शतकातील प्रश्नांची ओळख नव्या पिढीला होण्यासाठी हे पुस्तक वाचावे असे सांगताना डॉ.ह.वि.सरदेसाई यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून " मानव आणि त्याचा परिसर यांतील सुसंवाद म्हणजे चांगले आरोग्य" अशी आरोग्याची व्याख्या केली आहे.

आज माणूस चंद्र आणि मंगळावर पोहोचून वेगवेगळ्या ग्रहांवर वसाहती करण्याच्या प्रयत्नात आहे. समुद्राच्या खोल अंतरंगात शिरून आणि डोंगर पोखरून दळणवळणाचा वेग अमर्यादित वाढवू शकला आहे. संगणक क्रांतीनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे अनेक क्षेत्रात आश्चर्यजनक बदल होऊ लागले आहेत. ही मानवी प्रगती नेत्रदीपक असली तरी अनेक देश अण्वस्त्रांनी सुसज्ज झाल्याने जगातील सर्व प्राणिमात्रांचा विनाश क्षणात घडवून आणता येईल अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. मानवी कृत्यांनी साऱ्या जगाला सातत्याने युद्धाच्या झळा बसत आहेत. अतिहव्यासामुळे पृथ्वीवरील पर्यावरण मोठ्या प्रमाणावर दूषित झालेले आहे. एकीकडे ज्ञानाधिष्ठित विकास घडत असताना दुसरीकडे गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढलेली आहे. दारिद्र्य, व्यसनाधीनता, गुन्हेगारी ,कुपोषण, ताणतणाव या समस्यांमध्ये वाढ होऊन मानवी जीवन सर्व पातळ्यांवर खालावलेले आहे. अशावेळी शाश्वत विकासाची संकल्पना मोहात पाडणारी आहे. असा विकास की ज्यामुळे मानवी गरजा भागवताना निसर्गाचा विनाश होणार नाही. मानवी प्रयत्नांनी हे जग अधिकाधिक सुंदर होईल असा आशावाद बाळगणारी नवी पिढी तयार करण्यासाठी उच्च शिक्षणात शाश्वत विकास ही संकल्पना महत्त्वाची ठरत आहे. भारतीय तत्त्वज्ञानात फार प्राचीन काळापासून शाश्वत मुल्यांचा

वेध घेतलेला आहे. मराठी संतसाहित्य आणि संतांचे कार्य हे जग अधिक सुंदर करण्यासाठी महत्त्वाचे ठरले आहे.

**संत साहित्यातील मूल्यविवेकाचे स्वरूप :**

" विश्व हे मोहरें लावावे" या हेतूने संत अथवा भागवत संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. हा संप्रदाय वारकरी संप्रदाय म्हणूनही ओळखला जातो. "इये मराठीयेचि नगरी, ब्रह्म विद्येचा सुकाळु करी" ही भूमिका घेऊन १३ व्या शतकात अज्ञान,कर्मठपणा, अंधश्रद्धा यांनी ग्रासलेल्या समाजजीवनाला नव्या जाणीवा, नव्या प्रेरणा देण्याचे कार्य ज्ञानदेवांनी केले. सर्व कालखंडात माणसाची द्विधा अवस्था ही अर्जुनाप्रमाणे झालेली आहे. संसार करणाऱ्या प्रत्येकाला कर्तव्य कोणते आणि अकर्तव्य कोणते हे कळेनासे होते तेव्हा "लोपले ज्ञान जगी, हित नेणंती कोणी..." अशा अवस्थेतून सदाचाराची जाणीव करून देण्याचे महान कार्य ज्ञानेश्वरांनी केले . ज्ञान लोपले तर ते पुन्हा जागृत करून समाजाचे हित घडविण्याचा संदेश ज्ञानदेवांच्या कार्यातून,काव्यातून मिळतो. निसर्ग प्रतिमांचा सहजसुंदर वापर आणि सुकुमार व माधुर्ययुक्त भाषा ही ज्ञानेश्वरांच्या भाषाशैलीची वैशिष्ट्ये होत .

" कमळावरी भ्रमर / पाय ठेवी हळुवार/
कुचंबेल केसर / इया शंका //
तैसे परमाणु पांगुंतले / जाणूनि जीव सानुले/
तेथ कारुण्यमाजी पाऊले/ लपवूनि चाले //"
ते वाट कृपेचि करित/ ते दिशाचि स्नेहभरित/
जीवातळी आंथरित/ आपुला जीव //"

अशा प्रकारची सुकुमार आणि माधुर्ययुक्त भाषा ज्ञानेश्वरांची आहे. वाणीतील मृदूपणा आणि चराचराला जाणून निसर्गाला जपण्याची भाषा ज्ञानेश्वरीत दिसते. "नवरसा भरवी सागर..." असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनी शांत ,अद्भुत ,भक्ती, वात्सल्य इत्यादी अनेक रसांचा प्रत्ययच आपल्या रसाळ वाणीतून दिला आहे. ज्ञानेश्वरी बरोबरच 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी','हरिपाठाचे अभंग' इ. रचनांमधून वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान उभे केले.

ज्ञानदेवांचे पसायदान हे मानवतावादी तत्त्वज्ञानाचे अतिशय रसाळ असे रूप आहे. "आता विश्वात्मके देवे.." असे म्हणत विश्वाला व्यापून राहिलेल्या चैतन्याला ते साद घालतात. जातपात,भेदाभेद असे सर्व सीमांचे अंतर नाहीसे करतात. अवघ्या पृथ्वीतलावरील माणूस हा एक होतो. या विश्वात्मक देवाला ते मागणे मागतात,

"जे खळांची व्यंकटी सांडो /तया सत्कर्मी रती वाढो/
भूता परस्परे जडो, मैत्र जिवांचे //"

दुष्टावा हा एक भाव आहे. माणूस वाईट नाही तर तो दुष्टभाव नाहीसा होऊ दे. प्रत्येकाला चांगल्या सत्कर्मांची आवड निर्माण होऊ दे. पशुपक्षी, वृक्षवेली, मानव, सर्व चराचर सृष्टीमध्ये मैत्रभाव निर्माण होऊ देत ..ज्ञानेश्वरांच्या पसायदानात दिसणारे पर्यावरण हे असे

सर्व सृष्टीला सामावून घेणारे आहे. माणसाचा अहंकार संपून सृष्टीतील एक जीव म्हणून तो सर्व तत्त्वांशी जोडला जाण्याचा मानस ज्ञानदेव व्यक्त करतात. सर्वांच्या जीवनातील अंधार दूर होऊन सर्वांचे जीवन प्रकाशाने उजळून निघू देत अशा कितीतरी सुंदर नितांत मानववादी भावनांची मांडणी पसायदानातून घडते. सर्व विश्वातील सजीवांच्या भल्यासाठी, मांगल्यासाठी ते प्रार्थना करतात, " जो जे वांच्छिल, तो ते लाहो प्राणिजात/"... सर्वांच्या मनोकामना पूर्ण कर असे परमेश्वराकडे मागणे मागणारे त्यांचे अंतःकरण विशाल आहे.

"संत तोचि जाणा जगी/ दया, क्षमा ज्याचे अंगी /
लोभ अहंता नये मना / जगी विरक्त तोचि जाणा//"

असे मुक्ताबाईंनी म्हटले आहे. विठ्ठलाचे प्रेम, ध्यास, सत्संगती आणि भगवदचिंतन यात आयुष्य व्यतीत करणारे नामदेव "नाचू कीर्तनाचे रंगी/ ज्ञानदीप लावू जगी" या भूमिकेतून लोकांना शिकवण देतात .

उडाली पक्षिणी गेली अंतराळी/
चित्त बाळाजवळी ठेवोनिया /
तैसे माझे मन राहो का ईश्वरी/
मग सुखे संसारी असेन का//"

संसारात राहूनही परमात्म्याशी एकरूपता साधण्याचे कौशल्य संतांनी अंगी बाळवलेले होते,हे नामदेवांच्या या अभंगातून व्यक्त होते. मानवतेचा परमोत्कर्ष अठरा पगड जातीच्या संतांच्या काव्यरचनांमधून दिसून येतो. भगवद्गीतेवर भाष्य करून ज्ञानेश्वरांनी समतेचे तत्त्वज्ञान मांडले आणि गोरा कुंभार, नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी, चोखा मेळा, दासी जनाबाई ,गणिका कान्होपात्रा असे वेगवेगळ्या जातीधर्मांचे संत भागवत धर्माच्या पताकेखाली एकवटले. स्त्रियांना भक्तीचा अधिकार मिळाला. पंढरपूरचे विठ्ठल हे एकच दैवत मानून सारे भक्तीत तल्लीन झाले. कुंभारकाम करता करता गोरा कुंभार म्हणतात ,

"देवा तुझा मी कुंभार / नाशी पापांचे डोंगर //,

"अंतरीचे गूज बोलू ऐसे काही/ वर्ण व्यक्त नाही शब्द शून्य//" हे फार मोठे जीवनाचे तत्त्वज्ञान गोरोबाकाका सांगून जातात .

संतांनी आपले व्यवसाय कार्य करत भक्तीचा मळा फुलविला. "कांदा मुळा भाजी/ अवघी विठाई माझी//" असे म्हणणारे सावता माळी असेच थोर निष्ठावंत !

"आमची माळीयाची जात/ शेत लावू बागायत /
आम्हा हाती मोट नाडा/ पाणी जाते फुलझाडा//
शांती शेवंती फुलली /प्रेम जाई जुई व्याली /
सावताने केला मळा /विठ्ठल देखियेला डोळा//"

अशी नितांत सुंदर रचना सावतामाळी करतात. कर्तव्याचा, कर्माचा संदेश देणारे त्यांचे काव्य मराठी संत परंपरेत प्रसादयुक्त आणि अजरामर ठरले आहे. चोखामेळांनी " माझा शिणभाग हरवला/" असे आपल्या भक्तीचे वर्णन केले आहे. आपण हीन यातीत जन्मलो,पण भक्तीने

परमेश्वराच्या जवळ गेलो याची यथार्थ जाणीव चोखोबांनी आपल्या अनेक अभंगातून व्यक्त केली. आणि “ऊस डोंगा, परी रस नोहे डोंगा/” असे सांगून समाजात समतेची जाणीव वाढवली .चोखोबांच्या संपूर्ण परिवाराने अभंग रचना केली आहे .एक चांगला विचार संपूर्ण कुटुंबाची आणि संपूर्ण समाजाची उन्नती घडवून आणतो याचे हे महत्वाचे उदाहरण होय.संत जनाबाई याही “विठो माझा लेकुरवाळा /”.या अभंगातून विठ्ठलाशी सारा संत मेळा समरस झाल्याचे हृद्य चित्र रेखाटतात.

संत एकनाथांनी सोळाव्या शतकातील सामाजिक ,धार्मिक ,राजकीय परिस्थितीचा विचार करून भागवत धर्माला नवी दिशा दिली. भावार्थरामायण ,रुक्मिणी स्वयंवर असे ग्रंथ लिहून काळानुसार भक्तीचा नवा अर्थ लोकांना सांगण्याचा प्रयत्न केला. लोकभाषेचा स्वीकार करून त्यांनी मध्ययुगीन कालखंडात लोकांचे समाजमन घडवण्यासाठी नवी रचना केली .एकनाथांची भारुडे हसत खेळत लोकांना नीतीचा उपदेश करतात.”दादला नको ग बाई,” “ सत्वर पाव ग मला भवानी आई, रोडगा वाहीन तुला /” ही त्यांची भारुडे आजही लोकांच्या तोंडी आहेत.

संत साहित्याचा कळसाध्याय ठरलेले संत तुकाराम यांनी,” करितो कवित्व म्हणाल हे कोणी ,मज विश्वंभर बोलावितो” असे सांगून विनम्र भूमिका घेऊन आपल्या कवित्वाचे वर्णन केले आहे. संत तुकाराम हे पर्यावरणस्नेही होते. भंडाऱ्याच्या डोंगरावर त्यांनी आपली अभंगरचना फुलविली . एकांताचा अनुभव घेतला. विठ्ठलाच्या विचारांमध्ये तल्लीन झालेल्या तुकारामांना शेकडो अभंग स्फुरले.अनेक अभंगांतून त्यांनी समाजातील दाम्भिकतेवर प्रहार केला. आज जगतश्रेष्ठ कवी म्हणून तुकारामांचे अभंग अभ्यासले जातात.

“वृक्षवल्ली आम्हा सोयरे /वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती //”

“आकाश मंडप, पृथ्वी आसन / रमे तेथे मन क्रीडा करी//” अशा वृत्तीने तुकोबाराय निसर्गात रममाण होतात. तुकारामांच्या अनेक अभंगांनी सुभाषितांचे रूप धारण केले आहे. त्यांच्या अभंगातून कीर्तन, नामस्मरण, पंढरी महिमा, संत संगत आणि कर्मकांड विरोध असे अनेक विषय येतात.समाजातील अंधश्रद्धेवर त्यांनी आपल्या अभंगातून कडाडून हल्ला केला. त्यांच्या अनेक अभंगरचना नितांत सुंदर आणि काव्य म्हणून श्रेष्ठ प्रतीच्या आहेत.

“महापुरे झाडे जाती/ तेथे लव्हाळे वाचती//”
“ सुख पाहता जवापाडे/ दुःख पर्वतायेवढे//”
“दया तिचे नाव, भूतांचे पाळण आणि निर्दळण कंटकांचे//”
“ लहानपण देगा देवा/ मुंगी साखरेचा रवा//”
“ जगाच्या कल्याणा /संतांच्या विभूती//
देह कष्टविती/ उपकारे //”
“आलिया भोगासी असावे सदर //”
“ शुद्ध बीजापोटी/ फळे रसाळ गोमटी/”
“ कन्या सासुरासी जाये/ मागे परतुन पाहे//”

" मन करा रे प्रसन्न / सर्व सिद्धीचे कारण//"... अशा अनेक रचनांमधून तुकारामांनी समाजाला जो उपदेश केला आहे ,जो संदेश दिला आहे,त्यातून पर्यावरणस्नेही आणि सात्विक वृत्तीचा भाव तुकारामांनी कायम जपलेला आहे .

**संत साहित्यातील मानवतावाद आणि संतांचे तत्वज्ञान :**

"भेदाभेद अमंगळ" या दोन शब्दांतून मानवतावादाचे फार मोठे तत्वज्ञान सामावून घेणारे संत साहित्य मराठी साहित्याची वैश्विकता प्रकट करणारे आहे .जळी, स्थळी ,काष्टी, पाषाणी.. सगळीकडे परमेश्वर सामावलेला आहे, असे मानून संपूर्ण चराचर सृष्टीला समानत्त्वाच्या ,अद्वैतवादाच्या एकाच संकल्पनेत आणून संतांनी मानवतावादाला सर्वश्रेष्ठ मूल्य मानले. इसवी सन १३ व्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत, संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकारामांपर्यंतच्या संतांनी आपल्या विचारांच्या प्रसारार्थ जे जे मार्ग शोधले ते सर्व मार्गही मानवतावादाची महती सांगणारे होते .

संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात संत संप्रदायाचा पाया घातला. जातपात, उच्चनीचता ,गरीबश्रीमंत, मानवी-मानवेतर या सर्व भेदांच्या पलीकडे जाणारी नवी शिकवण ज्ञानेश्वरांनी समाजाला दिली. समाजातील कर्मठ विचारांवर प्रहार केला. तेराव्या शतकातील सर्व प्रकारची विषमता नाहीशी करण्याचे कार्य  ज्ञानेश्वरांनी आपल्या ओघवत्या वाणीतून मानवतावादी मूल्यांची मांडणी करून साध्य केले. "भावार्थ दीपिका" उर्फ "ज्ञानेश्वरी" हा ग्रंथ वारकरी अथवा संत संप्रदायातील महत्वाचा ग्रंथ आहे. जीवनाच्या सर्व जाणिवांना व्यापणारा असा हा ग्रंथ,मराठी भाषेची हे अद्भुत वैभवसामर्थ्य अनादिकाळापर्यंत मानवी मनावर प्रभाव टाकत राहील. ज्ञानेश्वरीतील अनेक निसर्गप्रतिमा मनाचा ठाव घेतात. निसर्ग, माणूस आणि अन्य जीवसृष्टी यांच्यातील भेद संपतो .चराचरसृष्टीशी माणूस जोडला जातो, हेच संत विचाराचे सार आहे. गळ्यात तुळशीची माळ घालणे हे अहिंसेच्या स्वीकाराचे प्रतीक मानणारा असा हा वारकरी संप्रदाय अहिंसावादी संप्रदाय आहे. नामभक्ती हे साधेसोपे परमेश्वर भक्तीचे साधन या संप्रदायाने दिले. त्यामुळे कर्मकांडाला आळा बसून  समाजातील अशिक्षित व तळागाळातील माणूस भक्तीच्या ,अध्यात्माच्या झेंड्याखाली विसावला. सत्कार्माची आवड त्याला निर्माण झाली.मानवी जीवनातील अनेक कमतरतांवर स्थिर राहून मात करता आली . टाळ-मृदंग या वाद्याद्वारे तल्लीनतेचा अनुभव सामान्य माणसाने घेतला, जगण्याच्या अनेक मानसिक त्रासांपासून मुक्ती मिळवण्यात यशस्वी झाला. ताण-तणावयुक्त जीवनात मुक्तीची जाणीव ही मानवी मनाला शांतवणारी ठरली. निसर्गातील प्रत्येक घटकात ईश्वराचे अस्तित्व आहे असे मानणारा वारकरी संप्रदाय असल्यने वृक्ष, नद्या, प्राणी, पक्षी यांच्या विषयी आदर आणि संरक्षणाची भावना संत साहित्यामध्ये असलेली दिसते. राग, लोभ ,क्रोध, मोह, माया मत्सर या षडरिपूचे उच्चाटन करणारी संतांची शिकवण आजच्या काळासाठी विशेष महत्त्वाचे ठरते . प्रा. गं.बा.सरदार, " संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती" या ग्रंथात स्पष्ट करतात, "वारकरी संतांनी बहुजन समाजाला आपल्या आंतरजीवनाचा साक्षात्कार घडवला. त्यामुळे लक्षावधी

क्षुद्रांच्या दुःखमय जीवनात एक नवी आशा निर्माण झाली. आपल्या मनःसामर्थ्यांचा त्यांना प्रथमच प्रत्यय आला आणि त्यांच्या विकासाला स्वतंत्र क्षेत्र सापडले. खेड्यापाड्यातील या गरीब व कष्टाळू लोकांना प्रवृत्तीचा , प्रयत्न वादाचा उपदेश करण्याची गरजच नव्हती. ते पिढ्यानपिढ्या आपापल्या व्यवसायात दिवसभर खपतच होते .तरीही त्यांचे दैन्य कधी फिटले नाही. ज्या समाजारचनेने त्यांचे भौतिक जीवन जखडलेले होते ते आरपार बदलून टाकण्याचा प्रश्नच त्या विशिष्ट परिस्थितीत उत्पन्न होण्याचा संभाव नव्हता, त्यामुळे देहधारणे पलीकडे या असंख्य लोकांच्या जीवनाला काही अर्थ उरला नव्हता. त्यांच्यातील मनुष्यत्व मेले होते. भागवत धर्माने ते मनुष्यत्व त्यांना परत मिळवून दिले. अत्यंत कठीण परिस्थितीतही शांतपणे आपले कर्तव्य करीत राहण्याची धमक त्यांच्या अंगी आली ही वारकरी संतांची मुख्य कामगिरी होय" हे विवेचन आजच्या परिस्थितीत खूप महत्त्वाचे ठरते. युद्धाने आजचे जग काळवंडलेले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे. हव्यासापोटी माणूस फक्त धावतो आहे. पण समाधान त्याच्यापासून हिरावले जात आहे. सर्वसामान्यांची अवस्था अतिशय दयनीय बनली असून नैसर्गिकत: मिळणारी शुद्ध हवा, पाणी ,आरोग्य या साध्या सुविधांसाठी आज मोठी किंमत मोजावी लागते हे वास्तव सर्वसामान्यांना हतबल बनवते आहे .अशा परिस्थितीत स्वतःच्या जीवनाचे प्रयोजन काय हे न कळून माणूस दिशाहीन बनला आहे. अशा माणसांमध्ये मूल्य विवेक जागा करून मानवी जीवनाचे अंतिम ध्येय म्हणजे सत्कर्मांमधून आनंद मिळविणे, आणि समाधानी असणे हे होय. हे त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी आणि म्हणूनच शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारे संत वाङ्मय आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहे.

म. गांधीजींनी" वैष्णव जन तो तेने काहीयें ,जो पीड पराइ जाने रे...या संत नरसिंह मेहता यांच्या भजनाद्वारे सामान्यांचे आत्मबळ वाढविले.गांधीजींनी अहिंसेचा पुरस्कार केला आणि स्वातंत्र्य लढ्यासाठी सर्वसामान्यांना निग्रहाचे, सत्याग्रहाचे हत्यार मिळवून दिले, हे उदाहरण शाश्वत विकासातील संत साहित्याचे महत्त्व दर्शवणारे आहे .

**शाश्वत विकासावर आधारित जीवन पद्धतीसाठी संत साहित्याचे महत्त्व :**

“मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास/ प्रसंगी वज्रास भेदू ऐसे//...” असे म्हणत तुकारामांनी समाजातील दांभिकतेवर प्रहार केला. समाजाला योग्य वळण देण्याचे कार्य सर्वच वारकरी संतांनी केले आहे. संसार करत करत परमार्थ साधण्याचे मर्म त्यांना सापडले होते. विठ्ठल भक्ती मध्ये रममाण होत, टाळ- मृदंगाच्या गजरामध्ये एकतल्लीनता साधल्याचा कलात्मक अनुभव संतांनी घेतला आणि समाजाला दिला.

जगात परिवर्तनाच्या प्रत्येक टप्प्यावर माणसाला निराश करणारे असंख्य अनुभव येत राहतील , अशावेळी स्थिरचित्त राहून आनंदाने जीवन जगण्याचा मार्ग शोधण्याचा संदेश संत साहित्यातून मिळतो. जीवनातील दैन्य-दुःखांचा विसर पडून प्रापंचिक माणूस भक्तीमध्ये जेव्हा तल्लीन होतो तेव्हा मानसिक सुखाची अनुभूती त्याला मिळते. ताण-तणावांपासून मुक्ती मिळवण्यासाठीची ही फार मोठी गोष्ट संत साहित्यातून घडते. नैतिकतेची शिकवण संतांनी

सातत्याने दिली आहे. त्यामुळे दंभ ,राग ,लोभ,मोह ,मत्सर ,माया  या षडरिपूपासून दूर जाऊन माणूस सात्विक वृत्तीत रमू लागला. भांडण,तंटा, राग, द्वेष यांमध्ये मानवी क्षण वाया जाऊ नये यासाठी सातत्याने संतांनी खटाटोप केला आहे ,.कर्म करा असा असाच संदेश संतांचे सर्व साहित्य देते. त्यामुळे संत साहित्यावर मिळमिळीतपणाचा ,टाळकुटेपणाचा जो आरोप केला जातो तो अतिशय अयोग्य असून त्यांनी दिलेल्या शाश्वत मूल्यांमुळे महाराष्ट्रीय समाज स्थिर आणि पुरोगामी वृत्तीचा बनला, हे मान्य करावे लागते.

**उच्च शिक्षणातील संत साहित्याचे महत्त्व :**

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा वयोगट साधारण अठरा वर्षांच्या पुढे असतो. या वयात विचारशक्ती विशेष जागृत झालेली असते. अनेक चांगल्या विचारांचा प्रभाव या काळात विद्यार्थ्यांवर पडतो. विद्यार्थ्यांच्या वैचारिक परिपक्वतेत जशी वाढ होते तसेच त्यांच्या विचारांना योग्य दिशा देण्याचा हा कालखंड असतो .संत साहित्याचा समाजमनावर आजही मोठा प्रभाव आपल्याला दिसतो. सर्व जातीधर्मांची  माणसे भेदभाव विसरून भगव्या पताके खाली एक होऊन वारीला जाताना, लाखोंचा समुदाय एकत्र कसा राहतो याचे आश्चर्य वाटायला नको. कित्येक शतकांच्या संतांच्या तत्वज्ञानामुळे हे होऊ शकले. निसर्गाला सुसंगत अशी जीवनशैली जगण्याचा संदेश संतांनी दिला आहे. विश्वबंधुत्वाचा संदेश संतांनी दिला आहे, त्याचाही प्रभाव उच्च शिक्षण घेणाऱ्या युवकांवर पडून त्यांच्या आयुष्याला एक योग्य अशी दिशा मिळते. असा समाज आनंदी, स्थिर, हव्यासाच्या पलीकडे गेलेला ,भौतिक सुखालोलुपतेला बळी न पडणारा  असा घडू शकतो, त्यासाठी शाश्वत मूल्यांचा विकास घडवून आणणारे संत साहित्य हे विशेष महत्वाचे ठरते. मानव आणि त्याचा परिसर यांमध्ये सुखसंवाद राखण्यासाठी संत विचार महत्वाचे आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

१ (डॉ.) वाटवे जनार्दन, “तीन कायापालट” प्र. वाटवे उषा ,पुणे ,जून २०००
२ जोशी प्र. न., “प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास”, स्नेहवर्धन प्रकाशन,ऑक्टोबर२००२
३ खांडेकर भालचंद्र,” ज्ञानेश्वरी :अध्याय नववा”, अनमोल प्रकाशन, १९८८
४ (प्रा.) सरदार गं.बा.,"संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती", म .सा.प ,पुणे, १९६२

*************************************************************************